ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ]
Total No. of Questions : 26 ]

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4
[ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 262-M (NS)**
**Code No. : 262-M (NS)**

# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು — ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ
# ( ಐಚ್ಛಿಕ ವಿಷಯ )
# FACILITATING LEARNING — SOCIAL SCIENCE
# ( Optional )

( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ )

( Marathi Version )

( ಹೊಸ ಪಠ್ಯವಸ್ತು )

( New Syllabus )

ದಿನಾಂಕ: 02. 07. 2015 ]
Date : 02. 07. 2015 ]

ಸಮಯ : ಮಧ್ಯಾಹ್ನ 2.00 ರಿಂದ 5.00 ರವರೆಗೆ ]
Time : 2.00 P.M. to 5.00 P.M. ]

[ ಪರಮಾವಧಿ ಅಂಕಗಳು : 60
[ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*
*Register Number of the Candidate*

## भाग - I

खालील प्रश्नांना **चार** पर्यायी उत्तरे दिली आहेत. त्यापैकी योग्य उत्तर निवडून उत्तरपत्रिकेत लिहा. सर्व प्रश्न आवश्यक आहेत. 10 × 1 = 10

1. इतिहास विषयाला पूर्वी 'समाज शास्त्र' म्हणून ओळखले जात असे आता 'समाजविज्ञान' म्हणून अभ्यासले जाते याचे मुख्य कारण

   A) आधुनिक काळात सर्व काही विज्ञानासी निगडीत आहे

   B) 'समाजविज्ञान' हि देखील विज्ञानाची एक शाखा आहे

   C) 'विज्ञान' हा शब्द विद्यार्थांना आकर्षित करतो

   D) विषय घटक शास्त्रीय दृष्टीने अभ्यासला जातो.

2. भारतदेशाला निधर्मी राष्ट्र मानले जाते कारण
   - A) या भूमीवरील कायदे धर्मातीत आहेत
   - B) भारत हे जातीरहित राष्ट्र आहे
   - C) या भूमीवरील कायदे धर्मानुरूप वेगवेगळे आहेत
   - D) कायदे धर्माच्या चौकटी धरुन बनविले आहेत.
3. 5 E नमुन्यानुसार नविन घटकांश आणि संकल्पनांची सुरुवात करणारे टप्पे हे आहेत
   - A) तपशीलवार तयार करणे
   - B) व्यस्त असणे
   - C) वर्णन करणे
   - D) शोध घेणे.
4. भारताच्या स्वातंत्र लढयातील महत्वाचा योग्य क्रम हा आहे
   - A) दांडी यात्रा, खिलाफत चळवळ, भारत छोडो, असहकार चळवळ
   - B) भारत छोडो, दांडी यात्रा, खिलाफत चळवळ, असहकार चळवळ
   - C) असहकार चळवळ, खिलाफत चळवळ, दांडी यात्रा, भारत छोडो
   - D) खिलाफत चळवळ, असहकार चळवळ, भारत छोडो, दांडी यात्रा.
5. विद्यार्थ्यांच्या छोट्या गटाने सौर मंडळावर आधारीत प्रतिकृती ( Model ) तयार केली आहे तर हे वर्गीकरण क्रियेच्या कोणत्या तत्वाशी संबंधीत आहे ?
   - A) आकलन
   - B) निर्मिती करणे
   - C) पृथःकरण करणे
   - D) स्मरण.
6. मजकूर, श्राव्य, चित्र, दृक्-श्राव्य इ० इलेक्ट्रॉनिक संघटतांना असे म्हणतात
   - A) चित्रफीत
   - B) दूरदर्शन
   - C) आंतर जाळे ( Internet )
   - D) बहूसंपर्क साधने (Multimedia ).
7. समाजविज्ञानच्या अध्ययन आणि अध्यापनासाठी आवश्यक साधनांचा संग्रह आणि प्रदर्शन केली जाणारी जागा
   - A) शाळा
   - B) साधन खोली
   - C) ग्रंथालय
   - D) पुरातन वस्तू संग्रहालय.
8. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता समजून घेण्यासाठी योग्य असा दस्तावेज ( सामग्री )
   - A) निरीक्षण नोंदी
   - B) अहवाल
   - C) माहिती पत्रक
   - D) अल्बम.
9. वेगवेगळ्या क्षमतेच्या मुलांचे मौल्यमापन करताना पर्यायी पद्धत वापरावी लागते कारण
   - A) अशीमूले सामान्य मुलांच्या वेगा प्रमाणेच उत्तर देऊ शकत नाहीत
   - B) मौल्यांकन सोपे होते
   - C) सर्व मुलांना पुढील वर्गात घालावे लागते
   - D) वैयक्तिक फरकाला आदर देणे गरजेचे असते.
10. निरंतर आणि व्यापक मौल्यांकनांचा महत्वाचा फायदा हा आहे
    - A) विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी
    - B) योग्य पाठ पुरावा करण्यासाठी
    - C) विद्यार्थ्यांच्या चूका दुरुस्त करण्यासाठी
    - D) विद्यार्थ्यांना वरील वर्गात पाठविण्यासाठी.

## भाग – II

खालील कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक उत्तर **अर्ध्या** पानापेक्षा जास्त असू नये.
5 × 2 = 10

11. समाजविज्ञान विषयाकडे पाहण्याच्या अभ्यासाच्या पद्धतीच्या विविध पायऱ्या कोणत्या ?

12. इतिहास आणि भूगोल यांच्यामधील परस्पर संबंधाचे विश्लेषण करा.

13. संविधान म्हणजे काय ? एखाद्या देशाला संविधानाची गरज का असते याचे परिक्षण करा.

14. ''विद्यार्थ्यांच्या मध्ये लोकशाहीची मूल्ये विकसित करण्यास नागरिक शास्त्र उपयुक्त ठरते.'' चर्चा करा.

15. मानसिक नियंत्रणा खालील दोन भागांची उद्दिष्ट्ये थोडक्यात लिहा.

16. समाजविज्ञानाच्या वर्गात निर्णायक शिक्षणशास्त्राच्या योग्य वापरासाठी कोणत्याही चार घटना / प्रसंग सुचवा.

17. शिवाजी महाराजांचा राज्यकारभार दाखविणारी काल-रेषा तयार करा.

18. बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी निरंतर आणि व्यापक मुल्यमापन परिपूर्ण आहे. स्पष्ट करा.

## भाग – III

खालील प्रत्येक प्रश्नांला पर्याय प्रश्न आहे. त्यापैकी कोणतेही **एक** उत्तर लिहा. प्रत्येक उत्तर **एक** पानापेक्षा जास्त असू नये. 8 × 5 = 40

19. समाजविज्ञानचा अर्थ सांगा. याच्या व्याप्तीचे वर्णन करा.

**किंवा**

शाळेत समाजविज्ञानाच्या अध्ययनाचे महत्व याचे वर्णन करा.

20. ऑस्ट्रेलियाच्या पाच वैशिष्ट्यांचे वर्णन करा. या वैशिष्ट्यांची ओळख तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांना कशी करून द्याल ?

**किंवा**

19 व्या शतकादरम्यान भारतात झालेल्या सामाजिक सुधारणांच्या चळवळीमुळे कोणते सामाजिक बद्दल घडून आले. त्यांच्या हल्लीच्या समाज्याशी असलेला परस्पर संबंध स्पष्ट करा.

21. तुमच्या आवडीच्या घटकासाठी 5 E नमुन्यातील व्यस्त आणि शोध घेणे या पायऱ्यासाठी पाठ योजना तयार करा.

**किंवा**

तुमच्या संस्थेचा नकाशा तयार करा किंवा रचा. त्यामध्ये दिशा आणि महत्वाची ठिकाणे दाखवा.

22. समाजविज्ञानातील तुमच्या आवडीच्या कोणत्याही एका घटकावर आधारीत संकल्पनांची यादी करा. या संकल्पना सादर करण्याकरिता कोणत्याही चार कृतींची माहिती लिहा.

**किंवा**

समाजविज्ञानावर चर्चा करण्याकरिता योग्य घटक सुचवा. हे चर्चा सत्र तुम्ही कसे आयोजित कराल ? वर्णन करा.

23. खालीलपैकी कोणत्याही एका घटकाच्या अध्यापनामध्ये ICT चा वापर कसा कराल ? वर्णन करा :

(a) अंटार्कटिका

(b) भारताचा पहिला स्वातंत्र्य लढा.

**किंवा**

समाजविज्ञानच्या अध्यापनामध्ये पूरक वाचन साहित्याचा उपयोग कसा कराल ? पाच उदाहरणांनी स्पष्ट करा.

24. समाजविज्ञानाच्या यशस्वी अध्यापनामध्ये सामाजिक साधने सहाय्यक ठरतात. चार उदाहरणांच्या सहाय्याने तुमचे विधान स्पष्ट करा.

**किंवा**

इतिहासाच्या अध्यापनासाठी शिक्षकाना नकाशाचा वापर अटळ आणि सक्तीचा आहे. उदाहरणे देवून स्पष्ट करा.

25. समाजविज्ञानाच्या मूल्यांकनासाठी कोणतीही पाच तंत्रे आणि समर्पक सांधनांचे वर्णन करा. प्रत्येकासाठी योग उदाहरण द्या.

**किंवा**

विविध गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यांना सर्व समावेशक वर्गात मौल्यमापन करण्यासाठी कोणती पद्धत स्वीकाराल ? स्पष्ट करा.

26. विवरणात्मक प्रकारचे प्रश्न ( Essay type questions ) आणि वस्तुनिष्ठ प्रश्नांमधील फरकावर चर्चा करा.

**किंवा**

समाजविज्ञानामध्ये व्यापक आणि निरंतर मौल्यमापनाचे महत्व कोणते ? CCE आणि रूपणात्मक मौल्यमापन यामधील फरकांचे परिक्षण करा.